‘‘लातूर जिल्हयातील अहमदपूर व उदगीर तालुक्यातील शासकिय आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा तुलनात्मक भौगोलिक अभ्यास.’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी. (विद्या वाचस्पती) पदवीकरीता सादर केलेला शोधनिबंधाचा आराखडा

✧ संशोधिका ✧

पाटील पूनम रामानंद

(एम.ए., बी.एड्., एम.फिल.)

✧ मार्गदर्शक ✧

डॉ. वाघमारे जनार्धन केशवराव

सहयोगी प्राध्यापक (भूगोल विभाग)

(एम.ए., एम.फिल., पीएच.डी.)

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर जि.लातूर

✧ संशोधन केंद्र ✧

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

ऑगस्ट २०१७

लातूर जिल्हयातील अहमदपूर व उदगीर तालुक्यातील शासकिय आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा तुलनात्मक भौगोलिक अभ्यास.

प्रस्तावना :

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजाप्रमाणेच आरोग्य ही देखील मानवाची मुलभूत गरज आहे. आरोग्याला इंग्रजीमध्ये *Health* असे म्हणतात. Health हा इंग्रजी शब्द Haelch या ॲग्लो-सॅक्सन शब्दापासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ " Condition of being safe or sound or whole"असा होतो म्हणजेच रोगापासून मुक्त असणे किंवा रोग नसणे म्हणजेच आरोग्य होय.

कोणत्याही भौगोलिक प्रदेशात कोणत्या प्रकारचे हवामान, वनस्पती, प्राणी, मृदा, जलाशय आहेत त्यांचा देखील मानवी आरोग्यावर कसा विपरीत परिणाम होतो हे वैद्यकीय भूगोलामार्फत तपासले जाते. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात वैद्यकीय सुविधा अधिक प्रमाणात असतात. ग्रामीण भागातील लोकांचे आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे लोकांना खाजगी आरोग्य सेवांचा लाभ घेणे परवडत नाही. त्यामुळे ते आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. समाज जर निरोगी असेल तर देशाचा विकास होण्यास मदत होते. म्हणून प्रत्येक देशातील शासनसंस्था लोकांचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

भारतामध्ये लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी शासनाकडून जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र यांच्या माध्यमातून मोफत व कमी दरात आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या जात आहेत. एखाद्या प्रदेशात वाढत्या लोकसंख्येबरोबर आरोग्य केंद्रामध्येही वाढ होणे अत्यावश्यक असते. तसेच आरोग्य केंद्राचे वितरण देखील योग्य प्रमाणात होणे महत्त्वाचे असते. त्यामुळे शासकीय आरोग्य केंद्राच्या वितरणाचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

एकोणिसाव्या शतकात 'एडविन चॅटवीक' यांनी 'घाण ही रोगाची जननी आहे.' हा विचार मानवी जीवनात रुजविण्याचा प्रयत्न केला. आजार निर्माण करणारे रोग चार प्रकारचे असतात. शरीरशास्त्रीय, जीवशास्त्रीय, जीवाणूंच्या विपरीत परिणामामुळे किंवा शरीराच्या नियमित

चालणा-या प्रक्रियेमुळे होणारे बिघाड व त्यामुळे उद्‌भवणारे रोग उदा. ताप, हिवताप, विषमज्वर मुत्रपिंडाला सुज येणे, अपचन, कॅन्सर, क्षयरोग इत्यादी करीता सभोवतालच्या परिस्थितीतून जंतू नाश करणे, डास, टाईफाईड जंतू, कॉलराचे जंतू यांची उत्पत्ती घाणीत होते. त्यासाठी भरपूर पाणी वापरून संडास, गटारे घुतली गेली तर मानवी शरीर निरोगी राहण्यास मदत होते.

थोडक्यात मानव ज्या भौगोलिक पर्यावरणात जीवन जगत असतो त्या भौगोलिक पर्यावरणाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे प्रदेशानुसार मानवी आजारात विविधता आढळते. मानवाच्या आरोग्यावर कोणत्या घटकांचा परिणाम होतो याचाही अभ्यास भौगोलिक दृष्टीकोनातून करणे आवश्यक आहे.

अभ्यासक्षेत्र :

महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेस लातूर जिल्हयाचे स्थान आहे. लातूर जिल्हयातील अहमदपूर व उदगीर या दोन तालुक्याची निवड संशोधनासाठी अभ्यासक्षेत्र म्हणून केलेली आहे. अहमदपूर तालुका हा लातूर नांदेड या महामार्गावर असून लातूर पासून सुमारे ६२ किमी अंतरावर वसलेला आहे. या तालुक्याच्या पूर्वेस नांदेड, पश्चिमेस बीड, उत्तरेस परभणी जिल्हा आहे. दक्षिणेस चाकूर, उदगीर, रेणापूर व जळकोट या तालुक्याची सीमा आहे. अहमदपूर तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८° २३′ उत्तर ते १८° ५०′ उत्तर अक्षवृत्त व रेखावृत्तीय विस्तार ७०° २३′ पूर्व ते ७६° ६६′ पूर्व रेखावृत्त दरम्यान आहे. या तालुक्याचे क्षेत्रफळ ७८३.१५ चौ.कि.मी. आहे.

लातूर जिल्हयातील उदगीर तालुका हा लातूर जिल्हयाच्या पूर्वेस असून लातूरपासून जवळपास ६५ कि.मी. अंतरावर आहे. या तालुक्याच्या उत्तरेस जळकोट, दक्षिणेस देवणी, पश्चिमेस चाकूर व शिरुर अनंतपाळ हे तालुके आहेत. उदगीर तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८° १६′ उत्तर ते १८° ३७′ उत्तर आहे तर रेखावृत्तीय विस्तार ७६° ५६′ ते ७७° २१′ आहे. या तालुक्याचे क्षेत्रफळ ७७९.२२ चौ.कि.मी. आहे. इ.सन २०११ च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण लोकसंख्या ३,११,४५७ इतकी आहे.

गृहितके :

सदरील शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी खालील गृहितके विचारात घेलेली आहेत.

१. अहमदपूर व उदगीर तालुक्यातील शासकिय आरोग्य सुविधा केंद्रातील अंतरात समानता आढळत नाही.

२. अभ्याक्षेत्रात शासकिय आरोग्य सेवेपेक्षा खाजगी आरोग्य क्षेत्राचा वाटा अधिक आहे.

३. अहमदपूर व उदगीर तालुक्यातील शासकिय आरोग्य केंद्रात आरोग्यविषयक सुविधांची कमतरता आहे.

४. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अहमदपूर व उदगीर तालुक्यात शासनाकडून निर्माण केलेल्या आरोग्य केंद्राची संख्या कमी आहे.

अभ्यासाची उद्दिष्टये :

१. अहमदपूर व उदगीर तालुक्यातील मानवी आरोग्यावर परिणाम करणा□या घटकांचा अभ्यास करणे.

२. अहमदपूर व उदगीर तालुक्यातील आरोग्य केंद्राचे मंडळनिहाय वितरण अभ्यासणे.

३. अहमदपूर व उदगीर तालुक्यातील आरोग्य केंद्राच्या अभिक्षेत्रीय प्रारुपाचे विश्लेषण करणे.

४. अहमदपूर व उदगीर तालुक्यातील आरोग्य केंद्राच्या वाढीचा अभ्यास करणे.

५. अहमदपूर व उदगीर तालुक्यातील आरोग्य केंद्रातील कर्मचा□यांचा अभ्यास करणे.

६. अभ्यासक्षेत्रातील आरोग्यविषयक सुविधांची उपलब्धता व कमतरता असलेले क्षेत्र दर्शविणे.

७. अभ्यासक्षेत्रातील विविध आजारांचा अभ्यास करणे.

८. अभ्यासक्षेत्रातील आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा सुक्ष्म अभ्यास करणे.

आकडेवारी संकलन :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीचा आधार घेण्यात येणार आहे. प्राथमिक स्वरुपाची आकडेवारी मिळविण्यासाठी शासकिय आरोग्य केंद्रांना भेटी देवून प्रश्नावलीच्या साहयाने विविध स्वरुपाची आकडेवारी संकलित करणार आहे. त्यासाठी मुलाखत तंत्राचा वापर करणार आहे.

दुय्यम स्वरुपाची आकडेवारी प्राप्त करण्यासाठी जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, जनगणना पुस्तिका, विविध संशोधन पत्रिका, आरोग्याशी संबंधित पुस्तके, आरोग्य सेवा संचालनाचा अहवाल व इंटरनेटचा आधार घेणार आहे.

अभ्यास पद्धती :

सदर शोध प्रबंधासाठी मिळविण्यात आलेल्या प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण करण्यासाठी रेषालेख, स्तंभोलख, विभाजीत वर्तुळ, टिंब पद्धती, छाया पद्धती इत्यादी तंत्राचा वापर करणार आहे. याशिवाय अभ्यास क्षेत्रातील आरोग्य केंद्राचे वितरण कशाप्रकारे झालेले आहे हे पाहण्यासाठी निअरेस्ट नेबर पद्धतीचा वापर केला जाणार आहे. यासाठी खालील सुत्राचा वापर करणार आहे.

$$RN = \frac{\text{Observed Mean Distance}}{\text{Expected Mean Distance}}$$

$$0.5\sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा :-

RN = Randomities

A = Total Area

N = Total Number of Medical Centres

तसेच आरोग्य केंद्र आणि वस्त्या, लोकसंख्या व क्षेत्र यांचे सहसंबंध दाखविण्यासाठी स्पिअरमनने प्रतिपादन केलेल्या खालील पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे.

$$r = \frac{\Sigma\, dx.dy}{\sqrt{(\Sigma dx)^2 \times (\Sigma dy)^2}}$$

अभ्यास विषयाची निवड :

Health is Wealth शरीर हीच संपत्ती आहे. त्याचप्रमाणे Sound mind is sound body सदृढ शरीरामध्ये चांगले मन वास करते. म्हणजेच आरोग्य ही मानवी संसाधनाची महत्त्वाची गुरुकिल्ली समजली जाते.

मानवाला ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र व निवारा यांची गरज आहे. त्याचप्रमाणे आधुनिक युगात आरोग्य ही त्यापेक्षाही महत्त्वाची गरज आहे. त्यामुळे मानवी आरोग्याचा अभ्यास करण्यासाठी लातूर जिल्हयातील अहमदपूर व उदगीर तालुक्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा भौगोलिक अभ्यास करण्यासाठी या अभ्यास विषयाची निवड केलेली आहे.

लातूर जिल्हा मराठवाडयातील बालाघाट डोंगर रांगेतील एक महत्त्वाचा जिल्हा आहे. हा जिल्हा विकासाच्या मानाने मागासलेला आहे. त्यामुळे अभ्यास क्षेत्रातील अहमदपूर व उदगीर हे दोन्ही तालुके विकासाच्या दृष्टीने मागासलेले आहेत. या परिसरात लोकांना होणारे आजार व शासनाकडून मिळणा-या आरोग्यविषयक सुविधा यांचा अभ्यास करुन लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य सुविधा कशा पद्धतीने उपलब्ध करुन दिल्या जातात याचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडलेला आहे.

साहित्याचे पुनरावलोकन :

प्रस्तुत विषय अभ्यासण्याकरीता निश्चित करण्या अगोदर पूर्व साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

१) डॉ. देवेंद्र कुमार नायक :

यांनी " Spatial Patterns of Health Care in the Khasi Hills of Meghalaya" या शोध प्रबंधातून भारताच्या ईशान्य भागातील खासी टेकडयांच्या परिसरातील आरोग्य समस्यांचा शोध घेतला आहे.

२) डॉ. एम.पी. मानकरी :

यांनी बिदर व धारवाड या दोन जिल्हयातील आरोग्यविषयक सेवांच्या वितरणाचा तुलनात्मक अभ्यास " A comparative Geographical Analysis Study of Health care facilities in Bidar and Dharwad Districts." या शोधप्रबंधांतून केलेला आहे.

३) डॉ. विजय बैसाने :

यांनी " औरंगाबाद जिल्हयातील आरोग्यविषयक सुविधांचा भौगोलिक अभ्यास" या विषयावर संशोधन केले आहे. प्रस्तुत शोधप्रबंधांत यांनी औरंगाबाद जिल्हयातील आरोग्यविषयक सेवा सुविधांचा आढावा घेतलेला आहे.

४) डॉ. लांजेवार एच.डी. :

या संशोधकाने "गडचिरोली जिल्हयातील आदिवासीचे आरोग्य व मानवी आजार एक वैद्यकिय भूगोल" या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. या संशोधनात गडचिरोली जिल्हयातील आदिवासींच्या आरोग्याचा शोध घेतलेला आहे.

५) डॉ. विरकपाळे एस.एन. :

यांनी " उस्मानाबाद जिल्हयातील आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा भौगोलिक अभ्यास" या विषयात संशोधन केले आहे. या संशोधनात मानवी आरोग्यावर भौगोलिक पर्यावरणातील घटकांचा कसा प्रभाव पडतो व आरोग्य केंद्राचे वितरण यांचा शोध घेतला आहे.

प्रकरण योजना :

सदरील शोधप्रबंधासाठी प्रकरणाची रुपरेषा खालीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले

■ संकल्पनात्मक आराखडा

१.१ प्रस्तावना

१.२ आरोग्य भूगोलाचा अर्थ व व्याख्या

१.३ आरोग्य भूगोलाचा विकास

१.४ भारतातील आरोग्य भूगोलाचा विकास

१.५ आरोग्याची संकल्पना

१.६ आरोग्याचा अर्थ

१.७ आरोग्याचे नियम व लक्षणे

१.८ आरोग्य उपचार पद्धती

१.९ आरोग्य उपचार पद्धतीचा विकास

१.१० आरोग्यावर परिणाम करणारे घटक

१.११ भारतातील वैद्यकशास्त्र

१.१२ प्राथमिक आरोग्य केंद्र

१.१३ प्राथमिक आरोग्य केंद्राचे कार्य

१.१४ अभ्यास क्षेत्रातील आरोग्य सुविधा

१.१५ गृहितके

१.१६ उद्दिष्टे

१.१७ आधार सामग्री

१.१८ संशोधन सामग्री

१.१९ मर्यादा

१.२० साहित्याचे पुनरावलोकन

१.२१ प्रकरण योजना

प्रकरण दुसरे

■ अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटकांचा अभ्यास

२.१ प्रस्तावना

२.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.३ अभ्यास क्षेत्राचे स्थान व विस्तार

२.४ भूपृष्ठरचना

२.५ नदीप्रणाली

२.६ हवामान

२.७ मृदा

२.८ वनस्पती

२.९ पशुधन

२.१० कृषी

२.११ पिके व पिक पद्धती

२.१२ जलसिंचन

२.१३ उद्योगधंदे

२.१४ लोकसंख्या

२.१५ रस्ते व वाहतूक

प्रकरण तिसरे

■ आरोग्य केंद्राचे वितरण

३.१ प्रस्तावना

३.२ आरोग्य केंद्राचे पदानुक्रमे वितरण

३.३ आरोग्य केंद्राचे मंडळनिहाय वितरण

३.४ आरोग्य केंद्राचे बदलते प्रारुप व वितरण

३.५ आरोग्य केंद्रात झालेला बदल

प्रकरण चौथे

■ आरोग्य केंद्राची वाढ व विकास

४.१ प्रस्तावना

४.२ मंडळनिहाय लोकसंख्येत झालेली वाढ

४.३ मंडळनिहाय आरोग्य केंद्राच्या लोकसंख्येत झालेली वाढ

४.४ कालावधीनुसार आरोग्य केंद्राच्या संख्येत झालेली वाढ

४.५ मंडळनिहाय आरोग्य केंद्रात झालेली वाढ

प्रकरण पाचवे

■ आरोग्य केंद्राची केंद्रियता आणि पदानुक्रम

५.१ प्रस्तावना

५.२ केंद्रियता संकल्पना

५.३ केंद्रियतेचे प्रादेशिक वितरण

५.४ पदानुक्रमाचे प्रादेशिक विश्लेषण

प्रकरण सहावे

■ आरोग्य केंद्रातील विविध सेवापदांचा आढावा

६.१ प्रस्तावना

६.२ आरोग्य केंद्रातील पदाची आकृतीबंध

६.३ आरोग्य केंद्रातील भरलेल्या कर्मचाऱ्यांची सद्यस्थिती

६.४ मंडळनिहाय आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या पदाची रचना

६.५ आरोग्य केंद्रातील रिक्त पदाची सद्यस्थिती

६.६ आरोग्य केंद्रातील एकूण मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांचा आढावा

प्रकरण सातवे

■ अभ्यासक्षेत्रातील विविध प्रकारचे आजार , त्याची कारणे व उपचार पद्धती

७.१ प्रस्तावना

७.२ रोगाची संकल्पना

७.३ रोगाची व्याख्या

७.४ रोगाचा इतिहास

७.५ रोगाचे वर्गीकरण

७.६ अहमदपूर व उदगीर तालुक्यात वारंवार उद्‌भवणारे रोग व त्याची स्थिती

७.७ अहमदपूर व उदगीर तालुक्यात सतत उद्‌भवणारे प्रमुख रोग

१) क्षयरोग (Tuberculosis)

२) विषमज्वर (Typhoid)

३) हत्तीरोग (Lymphatic filariasis)

४) गॅस्ट्रो (Gastroenteritis)

५) अतिसार (Diarrhea)

६) कुष्ठरोग (Leprosy)

७) अमांश (Dysentery)

८) हिवताप (Malaria)

९) पटकी (Cholera)

१०) काविळ (Joundice)

११) डेंग्यु (Dengue)

१२) गोवर (Meastis)

१३) खरुज (Scabies)

१४) दमा (Asthma)

प्रकरण आठवे

■ क्षेत्र अभ्यास

८.१ प्रस्तावना

८.२ अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक विभाग

८.३. निवडक आरोग्य केंद्राचे स्थान

८.४ निवडक शासकिय आरोग्य केंद्रातील प्रमुख रोगाचा अभ्यास

८.५ सारांश

प्रकरण नववे

■ निष्कर्ष व शिफारशी

निष्कर्ष

शिफारशी

परिशिष्ट्ये

संदर्भग्रंथ

संदर्भग्रंथ :

1. Agnihotri R.C. (1995), Geometrical Environment and Health care, Rawat Publication, Jaipur.
2. Majid Hussain (1994) Medical Geography, Anmol Publication, New Delhi.
3. Basavanthappa B.T. (2008) Medical Surgical Nursing, Joypee Brothers Medical Publishers, New Delhi.
4. दिक्षित जगन्नाथ (2004) सामाजिक आरोग्य परिचर्या, सूर्य ऑफसेट, नागपूर
5. सिंघई जी.सी. (2006) चिकित्सा भूगोल वसुंधरा प्रकाशन गोरखपूर
6. लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन.
7. वैद्यकिय समाजशास्त्र : डॉ.सुधा काळदाते/डॉ.शंकर गायकवाड.
8. डॉ. वैद्य, आयुर्वेदाचा इतिहास - साधना प्रकाशन.
9. आरोग्य शिक्षण मार्गदर्शिका (2007) : नलिनी प्रकाशन, नागपूर
10. सौ.एम.आय.मोमीन, हेल्थ सेंटन मॅनेटमेंट : एम.आय.प्रकाशन कोल्हापूर (2010)

संशोधिका
कु.पाटील पूनम रामानंद
अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक
डॉ.वाघमारे जनार्धन केशवराव
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर जि.लातूर